| MHSN110014242022 | नियमित दिवाणी दावा क्र.२/२०२३<br>ज्ञानू दबडे / जब्बार मुल्ला |
|---|---|

## निशाणी १७ खालील आदेश

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.१ ते १५ यांच्यामार्फत त्यांची दाव्यास कैफियत मुदतीत दाखल न झाल्यामुळे त्यांच्या विरुध्द झालेला विना कैफियत आदेश रद्द होवून मिळण्यासाठी दाखल करण्यात आला आहे. प्रतिवादी असे म्हणतात की, यातील काही प्रतिवादी हे मजुरीसाठी बाहेरगावी होते. त्यामुळे, त्यांना जुनी कागदपत्रे वेळेत मिळाली नाहीत. त्यांनी जाणूनबुजून विलंब केलेला नाही. त्यामुळे, विलंब माफ होवून त्यांची कैफियत व म्हणणे अभिलेखावर घ्यावे अशी विनंती त्यांनी केलेली आहे.

२. या अर्जावर वादी यांनी म्हणणे देवून अर्जास विरोध केला आहे. त्यांचे असे म्हणणे आहे की, अर्जातील मजकूर खोटा व लबाडीचा आहे. अर्जातील कारण संयुक्तीक नाही. त्याबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल नाही. याकामी प्रतिवादी हे दिनांक १६/०१/२०२३ रोजी हजर झालेले आहेत. तेव्हापासून सुमारे दीड वर्षांचा विलंब झालेला आहे. त्यामुळे, अर्ज नामंजूर करावा पण अर्ज मंजूर करावयाचा झाल्यास दहा हजार रुपये दंड प्रतिवादी यांना आकारुन अर्ज मंजूर करावा अशी मागणी त्यांनी केली आहे.

३. उभय पक्षकारांचा युक्तीवाद ऐकला. याकामी वादी यांच्या विरुध्द कैफियत दाखल न केल्यामुळे विना कैफियत आदेश झाला होता. प्रतिवादी

यांनी प्रस्तुतचा अर्ज आजरोजी दाखल केला आहे. त्यांनी ३० दिवसात आणि तद्नंतर जास्तीत जास्त ९० दिवसामध्ये कैफियत सादर करणे गरजेचे होते. परंतु मा. सर्वोच्च न्यायालयाने वेळोवेळी दिलेल्या न्यायनिवाड्यामध्ये सदर ९० दिवसांचा कालावधी हा निर्देशक स्वरुपाचा असल्यामुळे पक्षकारांना त्यांची बाजू मांडण्यासाठी नैसर्गिक न्यायतत्वानुसार त्यांना संधी देणे गरजेचे असल्याबाबत नमूद केले आहे. त्यामुळे, अर्ज मंजूर न केल्यास विनाकारण गुंतागुंत होवून प्रकरणांची संख्या वाढणार आहे. सबब, प्रतिवादी यांना त्यांची बाजू मांडायला देणे या दाव्याच्या सुनावणीकरीता गरजेचे असल्यामुळे त्यांच्याविरुध्द झालेला विना कैफियत आदेश रद्दबातल करणे मला न्यायोचित वाटते. परंतु ब–याच कालावधीनंतर प्रतिवादी यांनी अर्ज दिल्यामुळे झालेल्या विलंबाबाबत दंड आकारणे योग्य होईल असे मला वाटते. त्यामुळे, मी खालील आदेश पारीत करते–

## <u>आदेश</u>

१. प्रतिवादी क्र.१ ते १५ यांचा अर्ज दंड म्हणून प्रत्येकी रक्कम रु.१००/– (अक्षरी शंभर रुपये मात्र) वादी यांना देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र.१ ते १५ यांनी दाव्यास दिलेली कैफियत व म्हणणे दाव्याचे कामी वाचण्यात येते.

ASHWINI JOTIRAM BACHULKAR

Digitally signed by ASHWINI JOTIRAM BACHULKAR
Date: 2024.08.12 16:32:24 +0530

आटपाडी. (अ. जो. बाचुळकर)

दिनांक : १२/०८/२०२४ दिवाणी न्यायाधीश क. स्तर, आटपाडी

*****

**CERTIFICATE**

I affirm that the, contents of this P.D.F. file order are same word to word, as per the original order -

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | Mr. Ketan Ashok Sargar, (Grade-III) |
| Court | : | Civil Judge Jr. Dn., & J.M.F.C., Atpadi |
| Date | : | 12/08/2024 |
| Order signed by the Presiding Officer | : | 12/08/2024 |
| Order uploaded on | : | 12/08/2024 |